# जनसंपर्क अधिकारी
**मिरा-भाईंदर, वसई-विरार**
पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ४०६/२०२४. दिनांक – २९/१०/२०२४.

**"Fake Invesment App मध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन फसवणुक केलेली २९,००,०००/- रु तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश"**

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील माणिकपुर पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे तक्रारदार नामे श्री. रोमिओ घोन्साल्वीस यांनी ऑनलाईन शेअर ट्रेंडिग करुन अधिक रक्कम मिळत असल्याने बनावट Fake Invesment App मध्ये रक्कमेची गुंतवणुक केली. परंतु तक्रारदार यांना कोणताही परतावा मिळाला नाही. त्यावर तक्रारदार यांना आर्थिक फसवणुक झाल्याने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केल्याने तात्काळ तक्रारी अर्जाची नोंद घेतली तसेच ऑनलाईन **NCCRP Portal ACK No. 31901240004290** अन्वये तक्रार नोंदविण्यात आली.

**(सायबर पोलीस ठाणे येथे अर्ज आवक क्रमांक ३११८ -बी/२०२३)**

तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज प्राप्त होताच झालेल्या व्यवहाराची सविस्तर माहिती घेवुन तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार यांचे फसवणुकीचे अनुषंगाने **माणिकपुर पोलीस ठाणे गु.रजी नं ००६/२०२३ भादविसं कलम ४२० सह आयटी ॲक्ट ६६ (क), ६६ (ड) प्रमाणे दाखल** करण्यात आलेला असुन प्राप्त तक्रारी अर्ज तसेच गुन्हयांचे तपासाचे अनुषंगाने सायबर पोलीस ठाणे यांचेकडुन तपास करण्यात आला.

तक्रारदार याची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका सादर केलेली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले. **अश्याप्रकारे सातत्यपुर्ण मागील ११ महिन्यापासुन सायबर पोलीस ठाणे यांनी मा.न्यायालय तसेच बँकेकडे तक्रारदार यांची रक्कम मिळविण्याकरीता पाठपुरावा करुन फसवणुक झालेली २८,६४,००/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

## अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- **कोणत्याही ॲपची पडताळणी केल्याशिवाय डाऊनलोड अथवा Investment ॲपमध्ये गुंतवणुक करु नये.**
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.**
- **facebook, Watsapp, Instagram अथवा Telegram Channel, वर जास्त परतावा देणा-या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.**
- **अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.**
- **जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.**
- **ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचेसह सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर,मपोअं/पल्लवी निकम, मपोअं/स्नेहल पुणे, पोअं/ओंकार डोंगरे सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

**----0000---**